आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ जुलै २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कारगिलमध्ये आपण केवळ युद्धच जिंकलं नसून सत्य, संयम, सामर्थ्याचं उदाहरण जगापुढं ठेवलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- प्राचीन वस्तूंची तस्करी, आयात-निर्यात आणि बेकायदेशीर आदानप्रदान रोखण्यासाठी भारत आणि अमेरिका यांच्यात विशेष करार
- महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत बांगला देशावर १० गडी राखून मात करत भारताची अंतिम फेरीत धडक

  **आणि**
- शेअर बाजारात सलग पाच सत्रांमधली घसरण थांबवत, सेन्सेक्सची १ हजार २९३ अंकांची उसळी, निफ्टीचा नव्या उच्चांकाला स्पर्श

**<><><><><>**

कारगिलमध्ये आपण केवळ युद्ध जिंकलं नाही, तर सत्य, संयम आणि सामर्थ्याचं अतुलनीय उदाहरण जगापुढे ठेवलं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. २५ व्या कारगिल विजय दिना निमित्त, प्रधानमंत्री मोदी यांनी आज लडाख मधल्या कारगिल युद्ध स्मारकाला भेट दिली. आणि कारगिल युद्धात कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना आदरांजली वाहिली, त्यावेळी ते बोलत होते. कारगिल युद्धात असत्य आणि दहशतीला, सत्यापुढे हार पत्करावी लागल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांंनी आज दूरस्थ पद्धतीनं लडाख मधल्या शिंकुन-ला बोगदा प्रकल्पाचा पहिला सुरुंग स्फोटही केला.

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी कारगिल विजय दिनानिमित्त देशाच्या सशस्त्र बलांप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे आणि त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहात आज कामकाजाची सुरुवात  कारगिलमधल्या शहीदांना आदरांजली अर्पण करून झाली. गेल्या सहा वर्षात १६ कोटी ८३ लाख नवीन रोजगार निर्माण झाल्याची माहिती कामगार आणि रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी आज संसदेत दिली. या ६ वर्षांच्या कालावधीत देशात एकूण रोजगारामध्ये ३५ टक्के वाढ झाली असल्याचं त्यांनी  राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितलं. लोकसभा आणि राज्यसभेत आजही अर्थसंकल्पावर चर्चा झाली.

**<><><><>**

लोकसभेचं कामकाज आज २०२४-२५ साठीच्या अर्थसंकल्पावरच्या चर्चेनं सुरु झालं. चर्चेत भाग घेताना भाजपाचे जुगल किशोर म्हणाले की, हा अर्थसंकल्प आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्वाचा असून, तो जनतेसाठी फायद्याचा ठरेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात सरकार देशाला स्वावलंबी बनवण्याचे सातत्यपूर्ण प्रयत्न करत असल्याचं पंचायती राज मंत्री राजीव रंजन सिंह म्हणाले. हा अर्थसंकल्प बिहार आणि आंध्र प्रदेश केंद्रित असल्याचा विरोधकांचा दावा त्यांनी फेटाळून लावला.

केंद्रसरकार हरियाणामधल्या प्रलंबित प्रकल्पांना महत्व देत नसल्याचा आरोप काँग्रेसचे जय प्रकाश यांनी केला.  शेतकऱ्यांसाठी किमान आधारभूत मूल्याचा मुद्दा उपस्थित करून ते म्हणाले की,  सरकारने या मुद्द्याचं निराकरण करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे, मात्र अनेक शेतकरी संघटनांना त्यामधून वगळण्यात आलं आहे.

अर्थसंकल्पात हिमाचल प्रदेशला सहाय्य केल्याबद्दल भाजपाच्या कंगना रनौत यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार मानले.

हा अर्थसंकल्प युवा, महिला, शेतकरी आणि गरिबांच्या फायद्याचा नसल्याचं आम आदमी पार्टीसाजे गुरमीत सिंह म्हणाले.

महागाईने होरपळत असलेल्या शेतकऱ्यांच्या चिंता दूर करण्यात अर्थसंकल्प अपयशी ठरल्याची टीका शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर बादल यांनी केला.

**<><><><><>**

कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज लोकसभेत एका लिहीत उत्तरामध्ये माहिती दिली की, २०१८ पासून, या महिन्याच्या २२ तारखेपर्यंत देशाच्या उच्च न्यायालयांमध्ये नियुक्त झालेल्या ६६१ न्यायाधीशांपैकी २१ न्यायाधीश अनुसूचित जमाती प्रवर्गातले, ७८ इतर मागास वर्ग, आणि ४९९ न्यायाधीश खुल्या प्रवर्गातले आहेत.

उच्च न्यायालयांमध्ये होणाऱ्या न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये सामाजिक विविधता राहावी, यासाठी, उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींनी न्यायाधीशांच्या नियुक्तीचा प्रस्ताव पाठवताना, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, अल्पसंख्याक आणि महिला प्रवर्गातल्या पात्र उमेदवारांचा विचार करावा, अशी विनंती सरकार करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची नियुक्ती भारतीय राज्यघटनेनुसार होत असून, यामध्ये कोणत्याही जाती अथवा वर्गाच्या व्यक्तींसाठी आरक्षणाची तरतूद नसल्याचं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

राज्यसभेचं कामकाज आज केंद्रीय अर्थसंकल्प २०२४-२५ वरच्या चर्चेनं सुरु झालं. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात केवळ अल्पकालीन लोनानुनयी निर्णय घेतले नसून मध्यम आणि दीर्घकालीन विचारांवर काम केल्याचं वायएसआरसीपीचे एस. निरंजन रेड्डी यांनी सांगितलं. तर, हा अर्थसंकल्प लोकविरोधी आणि संघराज्य विरोधी असल्याचा आरोप सीपीआयचे सदस्य पी संतोष कुमार यांनी केला. राजदचे ए डी सिंह यांनी देशातल्या

बेरोजगारीचा मुद्दा उपस्थित केला, आणि सर्वसाधारण अर्थसंकल्पात कृषी क्षेत्राकडे योग्य लक्ष पुरवण्यात आलं नसल्याचं ते म्हणाले.

<><><><>

प्राचीन वस्तूंची तस्करी, आयातनिर्यात आणि बेकायदेशीर आदानप्रदान रोखण्यासाठी भारत आणि अमेरिका या दोन्ही राष्ट्रात आज एक विशेष करार झाला. अशा प्रकारचा सांस्कृतिक मालमत्ता करार भारतानं अमेरिकेबरोबर करायची ही पहिलीच वेळ आहे. हा करार ऐतिहासिक असून यामुळे दोन्ही राष्ट्रांमधली भागीदारी अधिक दृढ होईल असं केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी बातमीदारांना सांगितलं.

<><><><>

श्रीलंकेत सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेतच्या उपांत्य फेरीत भारतानं बांगला देशाचा १० गडी राखून पराभव केला आणि अंतिम फेरीत धडक मारली. या सामन्यात नाणेफेक जिंकून बांगलादेशानं प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. या संघाला निर्धारित २० षटकात ८ बाद ८० धावा करता आल्या. भारतीय संघाकडून रेणुका सिंग आणि राधा यादव यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. भारतीय संघानं अवघ्या ११ षटकांत ८३ धावा करून बांगलादेशावर १० गडी राखून विजय मिळवला. भारताच्या सलामीवीर स्मृती मंधाना हिनं ३९ चेंडूत ५५, तर शेफाली वर्मानं २६ धावा केल्या.

<><><><>

पॅरिस ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा आज होत असून, भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ११ वाजता पॅरिसमधल्या सीन नदीच्या किनाऱ्यावर या भव्य सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी आयोजित परेडमध्ये भारताचं नेतृत्व ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू आणि टेबल टेनिस पटू शरथ कमल करणार आहेत.

**<><><><>**

सलग पाच सत्रांमधल्या घसरणी नंतर शेअर बाजारात आज तेजीचा जोर राहिला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज तब्बल १ हजार २९३ अंकांची उसळी घेतली आणि तो ८१ हजार ३३३ अंकांवर बंद झाला.

बाजार बंद होण्यापूर्वी झालेल्या खरेदीमुळे राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टिनं आज २४ हजार ८६१ अंकांचा नवा उच्चांक नोंदवला. मात्र तो नंतर थोडा खाली आला, आणि दिवसअखेर ४२९ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ८३५ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

आसाममधल्या चारैदव मोईदम या स्थळाला युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान मिळालं आहे. जागतिक वारसा समितीने नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत एकमताने हा निर्णय घेतला. मोईदम हे आसामच्या अहोम राजघराण्यांशी संबधित असणारं सातशे वर्षं जुनं स्थापत्य आहे.

गौरवशाली अहोम राजवटीचं प्रतिक असणाऱ्या मोईदम या स्थळाचा जागतिक वारसा स्थळांमध्ये समावेश केल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. यामुळे महान आहोम संस्कृतीबद्दलची जिज्ञासा वाढेल असा विश्वास त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात व्यक्त केला.

**<><><><>**

नीती आयोगाची ९ वी नियामक मंडळ बैठक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याच्या अध्यक्षतेखाली उद्या नवी दिल्लीतल्या राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात होणार आहे. 'विकसित भारत @ २०४७' अशी यावर्षीची संकल्पना असून भारताला विकसित राष्ट्र बनवणं या ध्येयावर लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे.

**<><><><>**

जम्मू आणि काश्मिरच्या सुधारित औद्योगिक जमीन वाटप धोरणाला आज मंजुरी मिळाली. नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या प्रशासकीय परिषदेच्या बैठकीत २०२१ ते ३० या कालावधीसाठीच्या धोरणाला मंजुरी मिळाली.